# वादीतर्फे साक्षीदार क्र. १ रोशन बापू पवार यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ४ चे विधिज्ञ श्री. एस. एम. सोनवणे यांच्यातर्फे शपथेवर सुरु

८. सदर दाव्यामध्ये जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. ती मी पाहिलेली आहेत. दावा कलम १/क मध्ये नमुद केलेली गट नं. १७१ ही माझ्या आईची वडीलोपार्जित मिळकत आहे. गट नं. १७१ च्या ७/१२ उताऱ्याला माझ्या मामाच्या मुलांची म्हणजेच प्रतिवादी क्र. ३ व ४ ची नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. १७१ चा ७/१२ उतारा मी दाव्यासोबत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १७१ माझ्या आईची वडीलोपार्जित मिळकत असल्याचे मी चुकीचे कथन केले आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १७१ हा वसंत कारभारी शिंदे यांच्या नावावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वसंत कारभारी शिंदेला मी या दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये दावा कलम १/क मध्ये मी जे मिळकतीचे वर्णन दिलेले आहे ते चुकीचे आहे. गट नं. १७१ चे क्षेत्र किती आहे. ते मला माहित नाही. गट नं. १७१ च्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत.

१०. गट नं. १७० चे क्षेत्र ०.२० आर आहे. गट नं. १७० च्या पश्चिमेला गट नं. १७१, दक्षिणेला गावठाण आहे. पूर्वेला व उत्तरेला काय आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये मी गट नं. १७० च्या दक्षिणेला शिव असे नमुद केले आहे ते चुकीचे आहे. गट नं. ३५४ चे क्षेत्र ०.३३ आर आहे. गट नं. ३५४ च्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींमध्ये माझे येणे–जाणे

नसल्यामुळे व माझा त्यांच्याशी संबंध नसल्यामुळे मला दावा मिळकतींच्या चतुःसिमा सांगता येत नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा पंढरीनाथ भिकाजी शिंदे दि.०५.०१.२०१० रोजी मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांच्या मृत्यूपर्यंत ते प्रतिवादी क्र. १ सोबतच राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांचा शेवटपर्यंत सांभाळ, औषधोपचार प्रतिवादी क्र. १ करत होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांचा सांभाळ प्रतिवादी क्र. १ व त्यांचा भाऊ मयत भास्कर पंढरीनाथ शिंदे करत होते. माझे मामा भास्कर शिंदे सन २०१० मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे मामा भास्कर शिंदेंचे उत्तरकार्य प्रतिवादी क्र. १ ने केले.

१२. भास्कर शिदेंच्या मृत्यूनंतर त्यांची मुलगी सिमा व प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकतीतील त्यांचे हक्क प्रतिवादी क्र. १ च्या लाभामध्ये सोडून दिले किंवा कसे हे मला माहित नाही. सदरचा दावा दाखल करतांना वकीलांना माहिती मिच दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये मी भास्कर शिंदेंची मुलगी सिमा शिवाजी बुनगे व प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकतीतील त्यांचे हक्क प्रतिवादी क्र. १ च्या लाभामध्ये सोडून दिल्याचे चुकीचे नमुद केले आहे. भास्कर शिदेंच्या मृत्यूनंतर त्यांची मुलगी सिमा व प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकतीतील त्यांचे हक्क प्रतिवादी क्र. १ च्या लाभामध्ये सोडून दिले हे मी वर जे नमुद केले आहे ते चुकीचे कथन केले आहे.

१३. माझ्या बहिणीचे लग्न सन २०१२ मध्ये झाले. तिची जन्म तारीख दि.२९.११.१९९५ अशी आहे व माझी जन्मतारीख दि.२४.०४.१९९४ अशी आहे. माझ्या बहिणीचे म्हणजे वादी क्र. २ चे लग्न ती १६–१७ वर्षाची असतांना झाले. माझ्या बहिणीचे लग्न माझे चुलत मामा गोपीनाथ शिंदे, सिद्धेश्वर शिंदे, कचेश्वर शिंदे, सुभाष शिंदे, रामदास शिंदे यांनी लावून दिले.

त्याबाबत मी त्यांचा साक्षी पुरावा घेणार आहे. माझी बहीण वैशालीचे लग्न झाले तेव्हा मी सज्ञान होतो. तेव्हा माझे वय १८ वर्ष होते.

१४. मी माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. तेव्हा मी वडाळी भोईला राहत होतो. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील पत्ता माझ्या आधार कार्डवरुन घेतलेला आहे. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नाशिकचा माझा जो पत्ता नमुद केलेला आहे तेथे मी पूर्वी राहत होतो. त्यामुळे तो पत्ता माझ्या शपथपत्रामध्ये लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी भुत्याणेला राहत होतो हे खोटे नमुद केले आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये नमुद मिळकतींचा मी व प्रतिवादी एकत्रितपणे उपभोग घेत होतो हे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींचे माझी आई सुमन व प्रतिवादी क्र. १ व मयत भास्कर यांच्यामध्ये वाटप झाले नव्हते हे देखील मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ व मयत भास्करने चुकीची माहिती देऊन वारस नोंद क्र. १२६१ मंजूर करुन घेतल्याचे मी खोटे नमुद केले आहे.

१६ फेरफार नोंद क्र. १२६१ कधी मंजूर झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नोंद क्र. १२६१ च्या नोंदीविरुद्ध मी आजतागायत महसुल दप्तरी तक्रारी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नोंद क्र. १२६१ दि.०१.०४.२०१० रोजी मंजूर झालेली आहे. प्रतिवादी क्र. १, ३, ४ मधील वाटपाची नोंद कधी झाली ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ती नोंद देखील मी आव्हानित केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या नोंदींची मला सुरुवातीपासूनच माहिती असल्यामुळे मी त्या आव्हानित केल्या नाहीत.

१७. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींशी माझा काहीही संबंध नाही

व सदरचा दावा दाखल करण्याचा मला कोणताही अधिकारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई सुमनने दावा मिळकतीतील तिचा हक्क तिच्या हयातीमध्ये प्रतिवादी क्र १ व मयत भास्करच्या लाभामध्ये सोडून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, अशी सर्व वस्तुस्थिती असतांना प्रतिवादींच्या गावातील हितशत्रुंच्या सांगण्यावरुन सदरचा खोटा व मुदतबाह्या दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.02.07 13:17:29 +0530

दि. ०७.०२.२०२६.
चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चांदवड.